# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द), ता. आंबेगाव, जि.पुणे- ४१२ ४०५

दूरध्वनी क्र. ०२१३३-२३०५८२ ई मेल - gcoeara@gmail.com
फॅक्स क्र. ०२१३३-२३०५८३ संकेतस्थळ - www.gcoeara.ac.in


जा.क्र.शाअवसंमअ/विवि/२०२०/2049

दिनांक : 06 AUG 2020

## -: विद्यार्थ्यासाठी महत्वाची सुचना :-

**संदर्भ- १. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठ पुणे यांचे पत्र क्र.परीक्षा/एसॲण्डटी/५६१ दि. ०५/०८/२०२०**

उपरोक्त संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात आल्याप्रमाणे महाविद्यालयातील चालू शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रवेशित असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठ पुणे यांच्याकडून कोविड १९ च्या पार्श्वभुमीवर जाहीर करण्यात आलेल्या जुलै २०२० च्या (उन्हाळी) प्रथम ते अंतिमपुर्व वर्षाच्या निकालानंतर Performance Improvement साठी इच्छूक विद्यार्थ्याकडुन परीक्षा अर्ज भरून मागविणे सुरू केले आहे. ज्या परीक्षांचे निकाल ३१/०७/२०२० पर्यत जाहीर झाले आहेत. अशा विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज दि. ०६/०८/२०२० ते १६/०८/२०२० (एकुण १० दिवस) या कालावधीमध्ये भरावयाचे आहे. तसेच ज्या परीक्षांचे निकाल दि. ०५/०८/२०२० नंतर जाहीर करण्यात येतील. त्यांच्यासाठी परीक्षा अर्ज भरण्याची मुदत निकाल जाहीर झाल्यानंतर तिस-या दिवशी सुरू होवून पुढील १० दिवसापर्यंत राहील.

जुलै २०२० च्या (उन्हाळी) प्रथम ते अंतिमपुर्व वर्षाच्या निकालानंतर Performance Improvement साठी इच्छूक विद्यार्थ्यांने लेखी परीक्षेच्या(Theory Exam) विषयाचे परीक्षा अर्ज खालील नियमांच्या अधिन राहुन परीक्षा अर्ज भरावा.

१) Performance Improvement परीक्षेसाठी अर्ज भरतांना ज्या विद्यार्थ्यांनी उन्हाळी २०२० च्या परीक्षेचे अर्ज भरलेले आहेत. व ज्या विषयांना गणितीय सुत्राचा वापर करून गुण देण्यात आले आहेत. त्याच विषयांना Performance Improvement ची संधी असणार आहे.

२) Performance Improvement च्या परीक्षेकरीता कोणतेही परीक्षा शुल्क असणार नाही.

३) उन्हाळी २०२० च्या परीक्षेसाठी ज्या विद्यार्थ्यांनी पहील्यांदा(Fresh) परीक्षा अर्ज केले आहेत. व ज्यांना गणितीय सुत्रानुसार गुणदान करण्यात आले आहे.फक्त अशाच विद्यार्थ्यांना कमीत कमी एक विषयासाठी व जास्तीत जास्त सर्व लेखीपरीक्षेच्या विषयाकरीता परीक्षा अर्ज भरता येतील.

४) Performance Improvement ची परीक्षा झाल्यानंतर मिळालेले गुण /निकाल हे त्या विद्यार्थ्यांचे उन्हाळी २०२० च्या परीक्षेचे अंतिम गुण/निकाल समजण्यात येईल.

५) तसेच जे विद्यार्थी Performance Improvement करीता अर्ज करतील त्यांना उन्हाळी २०२० चे गणितीय सुत्रानुसार गुणदान केलेले गुणपत्रक न देता Performance Improvement च्या परीक्षेच्या निकालानुसार एकच गुणपत्रक देण्यात येईल.

६) तसेच विद्यार्थी Performance Improvement च्या परीक्षेमध्ये ज्या विषयाची निवड करणार नाही.त्यांचे त्या विषयाचे पुर्वीचे (गणितीय सुत्रानुसार निश्चित केलेले) गुण ग्राहय धरण्यात येतील.

७) Performance Improvement परीक्षेचा Syllabus व अधिक माहीतीसाठी संदर्भीय पत्राचे अवलोकन करावे.(सोबत संदर्भीय पत्र जोडले आहे.)

6/8/2020

डॉ. अ.शि.पंत
प्राचार्य
शासकिय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
अवसरी खुर्द ता. आंबेगाव जि.पुणे.

प्रत- माहीती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

१.विभागप्रमुख-अनुविद्युत/उपकरणीकरण/संगणक/स्वयंचल/स्थापत्य/यंत्र/उपयोजित वि./कर्मशाळा त्यांनी ही सुचना व सोबतचे परिपत्रक आपल्या विभागातील विद्यार्थ्यांच्या What,s App ग्रुप वर त्वरीत पाठवावी.

२.डि. पी. यु. विभाग यांनी सदर सुचना सर्व विभागप्रमुखांना मेल करावी.

३. श्री. डी.जे. परेरा सहाय्यक प्राध्यापक संगणक- यांनी सदर सुचना संस्थेच्या संकेतस्थळावर त्वरीत प्रदर्शित करावी.

४. महाविद्यालय परीक्षा अधिकारी यांना माहीतीसाठी.

परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे ४११ ००७
दूरध्वनी क्र. २०२५६२१३४६
Website: www.unipune.ac.in

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**

(Formerly University of Pune)

Board of Examinations & Evaluation
Ganeshkhind, Pune-411007
Phone: 2025621343
E-mail: coe@unipune.ac.in

संदर्भ : परीक्षा/एसऑण्डटी/ ५६१

दिनांक : ०६/०८/२०२०

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा.

**विषय** : कोव्हीड १९ च्या पार्श्वभुमीवर जाहीर करण्यात आलेल्या जुलै २०२० च्या (उन्हाळी) प्रथम ते अंतिमपूर्व वर्षाच्या निकालानंतर Performance Improvement साठी इच्छुक विद्यार्थ्यांच्या परीक्षा अर्जाबाबत.

**संदर्भ** : १. महाराष्ट्र शासन उच्च शिक्षण विभाग यांचे दि. ०८.०५.२०२० चे पत्र.
२. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. ९३ व ९४/२०२०, दि. १६.०५.२०२०.

महोदय/महोदया,

कोव्हिड - १९ महामारीच्या अभूतपूर्व परिस्थितीमध्ये विद्यापीठाच्या शैक्षणिक वेळापत्रकाचे नियोजन, परीक्षांचे आयोजन व निकाल जाहीर करण्यासंदर्भात महाराष्ट्र शासन उच्च शिक्षण विभाग यांच्या दि. ०८.०५.२०२० च्या पत्रास अनुसरून विद्यापीठाने परिपत्रक क्र. ९३ व ९४/२०२०, दि. १६.०५.२०२० निर्गमित केलेली आहेत. सदर परिपत्रकास अनुसरून विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने मान्यता दिल्यानुसार प्रथम ते अंतिमपूर्व परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात येत आहेत.

विद्यापीठाच्या परिपत्रक क्र. ९३ व ९४ दि. १६.०५.२०२० मधील ब (४) मध्ये नमूद केल्यानुसार "जून २०२० परीक्षेच्या निकालानंतर विद्यार्थ्यांना Performance Improvement हवी असल्यास त्याकरिता पुढील सत्रामध्ये संधी देण्यात येईल". सदर तरतुदीनुसार ज्या विद्यार्थ्यांना जुलै २०२० (उन्हाळी) प्रथम ते अंतिमपूर्व निकालामधील लेखी परीक्षेच्या विषयांना Performance Improvement हवी असेल त्यांच्याकरिता स्वतंत्र परीक्षा हिवाळी सत्राच्या परीक्षेपूर्वी आयोजित करण्यात येणार आहे. जेणेकरून या विद्यार्थ्यांपैकी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना हिवाळी सत्र २०२० च्या परीक्षेचे अर्ज भरण्याची संधी उपलब्ध होऊ शकेल. याकरिता जुलै २०२० च्या प्रथम ते अंतिमपूर्व परीक्षांच्या निकालानंतर Performance Improvement साठी इच्छुक विद्यार्थ्यांकडून ते इच्छुक असलेल्या लेखी परीक्षेच्या विषयांचे (Theory Exam) परीक्षा अर्ज खालील नियमांच्या अधिन राहून नव्याने भरण्याबाबत विद्यार्थ्यांना सूचित करण्यात यावे.

१) Performance Improvement साठी सदर परीक्षा अर्ज भरताना ज्या विद्यार्थ्यांनी उन्हाळी २०२० च्या परीक्षेचे अर्ज भरलेले आहेत व विद्यार्थ्यांच्या ज्या विषयांना गणितीय सूत्रांचा वापर करून गुण प्रदान करण्यात आलेले आहेत. त्याच विषयांना Performance Improvement ची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.
२) सदर Performance Improvement च्या परीक्षेकरिता कोणतेही परीक्षा शुल्क आकारण्यात येणार नाही.
३) उन्हाळी २०२० च्या परीक्षेसाठी ज्या विद्यार्थ्यांनी पहिल्यांदाच (Fresh) परीक्षा अर्ज केले आहेत व ज्यांचे गुणदान हे गणितीय सूत्रानुसार करण्यात आलेले आहे फक्त अशाच विद्यार्थ्यांना कमीत कमी एक ते जास्तीत जास्त सर्व लेखी परीक्षेच्या (Theory) विषयांकरिता परीक्षा अर्ज भरता येतील.

४) सदर परीक्षा अर्ज भरून देण्यासाठी कालावधी खालील प्रमाणे असेल :

अ) ज्या परीक्षांचे निकाल दि. ३१.०७.२०२० पर्यंत जाहीर झाले आहेत. अशा विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज स्वीकारण्याची मुदत दि. ०६.०८.२०२० ते १६.०८.२०२० (दहा दिवस).

ब) ज्या परीक्षांचे निकाल दि. ०५.०८.२०२० नंतर जाहीर करण्यात येतील, त्यांच्यासाठी अर्जांची मुदत निकाल जाहीर झाल्यानंतर तिसऱ्या दिवशी सुरू होऊन पुढील दहा दिवस अशी राहील.

५) सदर परीक्षा अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांची Performance Improvement ची परीक्षा झाल्यानंतर त्यांना मिळालेले गुण/निकाल हे त्या विद्यार्थ्यांचे उन्हाळी २०२० च्या परीक्षेचे अंतिम गुण/निकाल समजण्यात येईल.

६) सदर परीक्षेस "Special Examination" ची सुविधा लागू राहणार नाही.

७) जे विद्यार्थी Performance Improvement करता अर्ज करतील त्यांना उन्हाळी २०२० चे गणितीय सुत्रानुसार गुणदान केलेले गुणपत्रक न देता Performance Improvement ची परीक्षा झाल्यानंतर तयार होणाऱ्या निकालानुसार एकच गुणपत्रक देण्यात येईल.

८) जे विद्यार्थी Performance Improvement च्या परीक्षेमध्ये ज्या विषयाची निवड करणार नाहीत. त्यांचे त्या विषयाचे पूर्वीचे (गणितीय सुत्रानुसार निश्चित केलेले) गुण ग्राह्य धरण्यात येतील.

९) सदर Performance Improvement च्या परीक्षेकरिता अभ्यासक्रम खालील प्रमाणे राहील :

Syllabus for the performance improvement examinations:

A. Professional Programs/ Conventional PG Programs:

Performance improvement examinations of Theory Subject of interested students for even semesters of first to pre final year will be conducted on the basis of the syllabus completed up to 13th March, 2020.

B. Conventional Programs:

The performance improvement examination of theory subjects of the first to pre-final year students enrolled for the conventional programs will be conducted on the basis of १००% syllabus, as syllabus for such programs is already completed before the start of lockdown.

सदर पत्राचा आशय आपल्या महाविद्यालयातील/संस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणून द्यावा व इच्छुक विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज विहीत मुदतीमध्ये भरण्याबाबत सूचित करण्यात यावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(महेश काकडे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ